महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग,नाशिक
दुसरा मजला, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक-४२२००१
दुरध्वनी क्रमाक - (०२५३) २९७१५७४ E-Mail ID :- jd.nashik@mahakosh.in

आस्था/प्रशा-५/मोटर वाहन खरेदी/२९/२०२२-२३//९१ 3073 दिनांक:- 1 NOV 2023

प्रति,
मा. सहसंचालक ( संगणक )
संचालनालय लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय:-** निर्लेखीत शासकीय वाहन क्र. MH-१५ AA-७०८६ TATA INDIGO MANZA लिलावाद्वारे विक्री नोटीसची जाहिरात प्रसिध्द करणे बाबत.

**संदर्भ:-** १. या कार्यालयाचा वाहन निर्लेखन अदेश क्र.आस्था २०२० - २३/प्र-५/न.क्र.२६(२)/वा.दु.दे ख/१००६ दि. ०९.०५.२०२३.
२. शासन ज्ञापन क्र. सकिर्ण-२०२३/प्र.क्र.३८/कोषा- प्रशा-४ दि. १४.०७.२०२३.
३. संलेको/२०२३/प्रशा.कोषा./कार्या-५/नाशिक-वाहन निर्लेखन/८७१ दि. २७.०७.२०२३

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयाचे शासकीय वाहन क्र. MH-१५ AA-७०८६ TATA INDIGO MANZA संदर्भ क्र. १ च्या या विभागीय कार्यालायाच्या आदेशान्वये निर्लेखीत करण्यात आले आहे.

संदर्भ क्रं. २ व ३ अन्वये सहसंचालक लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक या कार्यालयास नविन वाहन मंजूर करण्यात आलेले आहे.

तरी निर्लेखीत वाहन लिलावाद्वारे विक्री करण्याकरीता दरपत्रक मागविणे कामी नोटीसच्या वेळापत्रकाची जाहिरात संचालनालयाच्या स्तरावरु शासनाच्या महोकोष या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

**सोबत:-** १. प्रपत्र-अ
२. वेळापत्रकाची नोटीस
३. दरपत्रक/निविदा अटी व शर्तीचे प्रपत्र

आपला विश्वासु,

**( माधव धो. थैल )**
सहा. संचालक (प्रशा)
लेखा व कोषागारे,
नाशिक विभाग, नाशिक.

**प्रत:** १) मा. वरिष्ठ कोषागार अधिकारी, नाशिक याना नोटीस बोर्डवर प्रसिध्दी करीता.
२) नोटीस बोर्ड करीता.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

# सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग,नाशिक

दुसरा मजला, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक-
४२२००१

दुरध्वनी क्रमाक - (०२५३) २९७१५७४ E-Mail ID .- jd.nashik@mahakosh.in

## : नोटीस:

सहसचालक, लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक कार्यालयातील निर्लेखित केलेले जुने वाहन क्र. MH-१५ AA-७०८६ TATA INDIGO MANZA (पेट्रोल कार) याची दरपत्रक मागवून लिलाव करावयाची आहे.

त्याबाबत सविस्तर अटी व शर्ती व संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाच्या संकेत www.mahakosh.in स्थळावर दिनांक २४/११/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

**लिलाव प्रक्रियेने विक्री कार्याक्रम**

| | | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | प्रसिध्दीचा दिनांक | २४/११/२०२३ | सकाळी १०.०० पासून |
| २. | दरपत्रक फॉर्म, कागदपत्रे सादर करणे स्विकारणे व वाहन पाहणे. | २८/११/२०२३ ते ०७/१२/२०२३ | सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० पर्यत |
| ३. | दरपत्रक फॉर्म, कागदपत्रे, धनाकर्ष स्विकारणे व वाहन पाहणे शेवटचा दिनाक | ०७/१२/२०२३ | सकाळी १०.०० ते सायकाळी ४.०० पर्यत |
| ४. | प्राप्त दरपत्रक उघडणे व अंतीम बोली लावणे. | ०८/१२/२०२३ | सकाळी ११.३० वा. |

कोणतेही दरपत्रक कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच त्यामध्ये कोणताही फेरबदल/सुधारणा करण्याचा सपूर्ण अधिकार सहसंचालक, लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक यांनी राखून ठेवला आहे. ज्या संस्थांना/व्यक्तींना सर्व अटी व शर्ती मान्य असतील. अशा संस्थांनी/व्यक्तींनी वरील कालावधीत प्रत्यक्ष वाहनाची पाहनी करुन लिलाव प्रकियेअंतर्गत दरपत्रक सादर करण्यामध्ये भाग घ्यावयाचा आहे.

**(माधव धो. थैल)**
सहा. संचालक,
लेखा व कोषागारे,
नाशिक विभाग, नाशिक.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग,नाशिक
दुसरा मजला, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक-४२२ ००१
दुरध्वनी क्रमाक - (०२५३) २९७१५७४ E-Mail ID - jd.nashik@mahakosh.in

**मुल्य रु. ५००/- (सदर शुल्क ना-परतावा आहे)**

सहसंचालक लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक कार्यालयाचे निर्लेखित केलेले शासकीय वाहन क्र. MH-१५ AA-७०८६ TATA INDIGO MANZA पेट्रोल कार याची विक्री करणे करीता विहीत नमुना.

**प्रपत्र - 'अ'**

| | |
|---|---|
| संस्थेचे/व्यक्तीचे नाव | |
| संस्थेचा/व्यक्तीचा पत्ता व मोबाईल क्रमांक | |
| आधार कार्ड/पॅन कार्ड क्रमांक | |
| निविदा सुचनेतील अटीनुसार निविदा नमुना शुल्क व इसार रक्कमेच्या धनाकर्षाचा तपशील | बँकेचे नांव धनाकर्ष क्र. व दि.<br>रक्कम |
| वाहनाची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर लिलाव प्रक्रियेद्वारे नमुद करण्यात आलेली रक्कम | अंकात ------------------/-<br>अक्षरी ------------------------------------------<br>**( कमीत कमी रु.४८,०००/- व त्यापुढे १०००/- च्या पटीत )** |

सहसंचालक लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक कार्यालयाचे निर्लेखित केलेले शासकीय वाहन ताब्यात घेण्यासाठी निविदा सूचनेत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. प्रपत्र-अ मध्ये नमुद केलेली सर्व माहिती सत्य आहे.

नांव------------------------------------------ संस्थेची/व्यक्तीची स्वाक्षरी----------------

(संस्थेच्या कार्यालयाचा रबरी शिक्का पदनाम व संपुर्ण पत्त्यासहीत)

## दरपत्रक / निविदा अटी व शर्ती

१. लिलावाची प्रक्रीया पूर्ण झाल्यानतर सपूर्ण रक्कम भरणा केल्यानतरच निर्लेखीत वाहन ताब्यात देण्यात येईल.

२. सदर वाहन सहसंचालक लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय लेखा कोष-भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक ४२२ ००१ येथे ठेवण्यात आले आहे. त्यानुसार **दिनांक २८/११/२०२३ ते ०७/१२/२०२३** या कालावधीत दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यत वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करून जास्तीत जास्त दर नमूद करावेत. वाहनाची सद्यस्थिती पाहिल्याशिवाय लिलावात भाग घेऊ नये अन्यथा नंतर कोणतीही तक्रार अथवा सबब स्विकारली जाणार नाही.

३. निर्लेखीत विक्री करण्यात यावयाच्या वाहनाची अंदाजित बोली कमीत-कमी रक्कम रु. ४८,०००/- इतकी आहे. सदर रकमेवर वाढीव बोली रक्कम रु. १,०००/- च्या पटीत असेल. (वाढीव बोली रकमेत फेरबदल करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.)

४. सदर दरपत्रक /निविदा नमुना शुल्क रु. ५००/- इतके आहे. सदर रकमेचा राष्ट्रीयीकृत बॅकेचा धनाकर्ष (Demand Draft ) ASST DIR ACCOUNT AND TREASURIES, NASHIK या नावाने दिनांक **०७/१२/२०२३** पर्यत नाशिक या कार्यालयात जमा करावयाचा आहे. सदर शुल्क ना-परतावा असून दरपत्रक / निविदा फॉर्म या कार्यालयातून प्राप्त करुन घेता येईल.

५. इसारा रक्कम (EMD) रु. ५,०००/- इतकी असून सदर रकमेचा राष्ट्रीयीकृत बॅकेचा धनाकर्ष (Demand Draft) ASST DIR ACCOUNT AND TREASURIES, NASHIK या नावाने **२८/११/२०२३ ते ०७/१२/२०२३** पर्यत नाशिक या कार्यालयात जमा करावयाचा आहे.

६. खालील कागदपत्रे दिनांक **२८/११/२०२३ ते ०७/१२/२०२३** दरपत्रक / निविदे सोबत जमा करणे अनिवार्य आहे. निविदा **नमुना प्रपत्र - 'अ'** (स्वतंत्र लिफाफयात), आधार कार्ड व पॅनकार्डची प्रत, वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र किंवा दुकाने व आस्थापना नोदणी प्रमाणपत्र (संस्थाकरीता), दरपत्रक / निविदा अटी व शर्तीच्या प्रतीवर साक्षांकित करण्यात यावे. (सही व शिक्क्यानिशी)

७. वरील ६. मध्ये नमुद कागदपत्रांची मुद्रीत स्वरुपातील (print) स्वयसाक्षांकित (self attested) करून दिनांक **०७/१२/२०२३** पर्यत (स्वतत्र लिफाफयात) नाशिक येथील कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील.

८. ज्या संस्थेची / व्यक्तीची लिलाव विक्रीची उच्चतम बोली स्विकारण्यात येईल त्या संस्थेने / व्यक्तीने सहसंचालक लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक कार्यालयाकडे उर्वरीत रक्कम एकरकमी राष्ट्रीयीकृत बॅकेचा धनाकर्ष (Demand Draft) ASST DIR ACCOUNT AND TREASURIES, NASHIK या नावाने कार्यादेश दिल्यापासून २ दिवसाच्या आत भरणे अनिवार्य आहे. संस्था व्यक्ती रक्कम कार्यालयाकडे वेळेत जमा करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला अपात्र ठरवून त्याची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

९. निर्लेखित वाहन लिलाव रकमेचा एकरकमी भरणा केल्यानंतर पुढील ७२ तासांच्या आत विक्री केलेले वाहन स्वखर्चाने सहसंचालक लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक कार्यालयाच्या आवारातुन उचलून नेणे आवश्यक आहे.

१०.लिलावाने विक्री करावयाचे वाहन जेथे आहे व ज्या अवस्थेमध्ये आहे त्या अवस्थेमध्ये ताब्यात घ्यावे लागेल, वाहनाच्या अवस्थेमध्ये कोणताही बदल सहसचालक लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक कार्यालयाकडून केला जाणार नाही.

११.प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संबंधित सदर वाहनाचा कोणताही खर्च सदर संस्थेस/व्यक्तीस करावा लागेल. हे कार्यालय याबाबतचा कोणताही खर्च करणार नाही. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संबंधित आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता देखील संबंधित व्यक्ती / संस्थेनेच करावयाची आहे.

१२.विक्री केलेले वाहन कार्यालयाच्या आवारातून नेणेचे कार्यवाही दरम्यान संपुर्ण व सर्व प्रकारचा खर्च ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल. त्याबाबत कोणताही खर्च कार्यालयाकडून केला जाणार नाही.

१३.ठेका मंजूर केलेल्या संस्थेने वाहन उचलण्याचे काम कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत साप्ताहिक / सार्वजनिक सुट्या वगळून कामकाजाच्या दिवशी करावयाचे आहे.

१४.लिलावाने विक्री केलेले वाहन कंत्राटदाराने ताब्यात घेतल्यानंतर कार्यालयाच्या आवाराबाहेर नेताना कार्यालयाच्या इमारतीचे / आवारातील कोणत्याही साहित्याचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदाराकडून त्याच ठिकाणी (on the spot) रोखीच्या स्वरुपात वसुल करण्यात येईल व याबाबत ठेकेदारास बाजू मांडण्याची कोणतीही संधी दिली जाणार नाही.

१५.निविदा कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अथवा त्यामध्ये कोणताही फेरबदल / सुचना करण्याचा संपूर्ण अधिकार सहसंचालक, लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक यांनी राखून ठेवला आहे. तसेच याबाबत कोणतीही कारणीमिमांसा केली जाणार नाही.

* सहसंचालक लेखा व कोषागारे नाशिक विभाग, नाशिक कार्यालयाचे जुने व निर्लेखित झालेले वाहन याचा दरपत्रक /निविदा सुचनेमध्ये नमूद केलेल्या वरील सर्व अटी / शर्ती मला पुर्णपणे मान्य आहेत. तसेच सदर अटी आणि शतीबाबत माझी कोणतीही तक्रार किंवा हरकत असणार नाही.

नाव-------------------------------------------------- स्वाक्षरी व संस्थेचा रबरी शिक्का--------

ठिकाण :-

दिनांक :-